जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2017
सकाळ



कोल्हापूर : कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले

# विद्यापीठात कर्मवीरांना अभिवादन

कोल्हापूर, ता. ९ : कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. मानव्यशास्त्र इमारतीसमोरील प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. आर. के. कामत, डॉ. जयदीप बागी, हर्षवर्धन पंडित उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2017 महाराष्ट्र टाईम्स

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथिनिमित्त महापालिकेच्यावतीने मध्यवर्ती बसस्थानकासमोरील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळयाला महापौर हसीना फरास यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक आशीष ढवळे, उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजचे उपप्राचार्य आर.पी. देठे, प्रा.एम.एम. पाटील, प्रा.पी.एस. चौगुले, डॉ. सुनील चंदनशिवे, डॉ.धनजंय नलवडे, डॉ.किशोर गायकवाड, प्रा.आर.व्ही. कुंभार, डॉ. के. बी. भोसले, प्रा. डी. सी. तुळसीकर, प्रा. एम. डी. कदम, कनिष्ठ अभियंता मीरा नगिमे, दिलीप पवार, उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मानव्यशास्त्र इमारतीसमोरील प्रांगणातील कर्मवीरांच्या पुतळयाला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी प्र -कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता पी. एस.पाटील, अधिष्ठाता ए. एम. गुरव, उपकुलसचिव जी. एस. कुलकर्णी, आर. के. कामत, विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2017
पुढारी



कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. मानव्यशास्त्र इमारती समोरील प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सकाळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. आर. के. कामत, डॉ. जयदीप बागी, हर्षवर्धन पंडित यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

10 MAY 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**दिलीप करंबेळकर : शिवाजी विद्यापीठातील नोंदलेखक कार्यशाळेत मांडले विचार**

# 'नवी ज्ञानसंस्कृती'साठी विश्वकोश काम करील

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राज्यात नव्या ज्ञानसंस्कृतीची चळवळ रुजविण्यासाठी मराठी विश्वकोश सर्वांसाठी मुक्त विद्यापीठ म्हणून काम करील, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातर्फे आयोजित मराठी विश्वकोश नोंदलेखक कार्यशाळेत ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषाभवनमधील या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. अध्यक्ष दिलीप करंबेळकर म्हणाले, मराठी विश्वकोशाची ज्ञानमंडळे विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी कार्यरत आहेत. महाराष्ट्रात आतापर्यंत सुमारे ४५ विषयांची ज्ञानमंडळे स्थापन झाली आहेत. येत्या काही दिवसांत आणखी ज्ञानमंडळे स्थापन होतील. डॉ. शिर्के म्हणाले, आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत भूमिका घेत विश्वकोशाने केलेली वाटचाल गौरवास्पद आहे.

विश्वकोश हा महत्त्वाचा संदर्भग्रंथ असल्याने अधिकाधिक लेखकांनी यात सहभागी व्हावे. कार्यक्रमास ज्ञानमंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. राजन गवस, अवनीश पाटील, सुधीर पोटे, डॉ. राजा दीक्षित, सतीश बडवे, चैतन्य कुंटे, वासंती रासम, नंदा पारेकर, भारती पाटील, उत्तरा सहस्रबुद्धे, अनिल सडोलीकर, रणधीर शिंदे, विश्वकोश मंडळाचे सदस्य डॉ. अरुणचंद्र पाठक, अरुण फडके, दीपक जेवणे, सहायक सचिव डॉ. जगतानंद भटकर, वर्षा देवरुखकर, आदींसह लेखक, विषयतज्ज्ञ उपस्थित होते. विश्वकोश मंडळाचे सहायक सचिव सरोजकुमार मिठारी यांनी प्रास्ताविक केले. नंदकुमार मोरे यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.



नसीर अत्तार

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी मराठी विश्वकोश नोंदलेखक कार्यशाळेत अरुण फडके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून सरोजकुमार मिठारी, जगतानंद भटकर, चैतन्य कुंटे उपस्थित होते.

## तज्ज्ञांचे मार्गदर्शन

- विद्यापीठातील आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र, मराठी इतिहास आणि देवल क्लबमधील संगीतशास्त्र ज्ञानमंडळांची ही संयुक्त कार्यशाळा झाली. यामध्ये पहिल्या सत्रात ज्ञानमंडळ व विश्वकोश मंडळाच्या सदस्यांनी लेखकांना नोंदलेखनाविषयी मार्गदर्शन केले.
- द्वितीय सत्रात अरुण फडके यांनी 'विश्वकोशातील भाषासंपादन' यावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात विश्वकोशाची संकेतस्थळे, त्यांचे स्वरुप, ज्ञानमंडळांची संकेतस्थळे यांवर डॉ. जगतानंद भटकर आणि सरोजकुमार मिठारी यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'निर्भया'ला अखेर न्याय

पाच वर्षांपूर्वी दिल्लीच्या दक्षिण भागामध्ये रात्री उशिरा आपल्या मित्रासह चित्रपट पाहून परत येणाऱ्या, पॅरामेडिकलच्या २३ वर्षीय विद्यार्थिनीवर



ड्रायव्हरसह एकूण सहाजणांनी धावत्या खासगी बसमध्ये बलात्कार केला. या घटनेत निर्भयाचे आतडे निकामी करण्यात आले. पोटावर व गुप्तांगावर रॉड खुपसण्यात आला. तिच्यासमवेत असलेल्या मित्राला मारहाण करून असहाय्य करण्यात आले. शेवटी दोघांनाही धावत्या बसमधून विवस्त्रावस्थेत बाहेर फेकून देण्यात आले. या सामूहिक बलात्कार प्रकरणातील कौर्याच्या विरोधात जगात आणि देशात एक आक्रोश तयार झाला. संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस बान की मून यांनी या प्रसंगाची गंभीर दखल घेऊन भारत सरकारला महिलाविषयक कायद्यात आवश्यक ते बदल करून कडक अंमलबजावणी करण्याची सूचना केली. भारतासह अनेक देशांत विविध ठिकाणी लोकांनी कँडल मार्च काढले, निदर्शने करून संताप व्यक्त केला. भारतीय संसदेत या घटनेवर सभागृहाचे लक्ष वेधताना खासदार जया बच्चन रडल्या. त्यावेळी सभागृहात अनेकांचे डोळे पाणावले. या प्रकरणात सर्वपक्षीय मतभेद बाजूला ठेवून महिला खासदार एकत्र आल्या. सोनिया गांधी यांनी रुग्णालयात जाऊन निर्भयाची भेट घेतली. सोशल मीडियावर तीव्र संताप, व्यक्त झाला. निर्भया प्रकरणाचा प्रत्येक तपशील हा सोशल मीडियावर देण्यात आला. १६ डिसेंबर २०१२ च्या रात्री निर्भया आणि तिचा मित्र ज्या खासगी बसमध्ये चढले, ती बस आधीच्या थांब्यावर एका लाँड्रीवाल्याने तक्रार केल्यानंतर ट्रॅफिक पोलिसांनी थांबवली असती, तर कदाचित ही भयानक घटना टाळता आली असती, या मुद्द्यावरही खूप चर्चा झाली. अक्षय ठाकूर, विनय शर्मा, पवन गुप्ता, मुकेश सिंह आणि ड्रायव्हर रामसिंह यांनी केलेल्या सामूहिक कृत्याचा परिणाम दिल्लीच्या विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. या निर्णयावर लोकांनी समाधान व्यक्त करून १६ डिसेंबर ते २९ डिसेंबरअखेर मृत्यूशी झुंज देऊन मृत्युमुखी पडलेल्या निर्भयाला न्याय मिळाला असे मत व्यक्त केले. या घटनेचे सामाजिक, राजकीय, कायदेविषयक क्षेत्रावर परिणाम होऊन संबंधित कायद्यांमध्ये बदल करण्यात आले. निर्भयाच्या मित्राने घडलेल्या घटनांचा तपशील टेलिव्हिजनवर आपल्या मुलाखतीत सांगितला. हा तिचा मित्र महत्त्वाचा पुरावा ठरला.

दिल्ली विशेष न्यायालयाच्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाने आरोपींना नुकतीच फाशीची शिक्षा कायम केली. पाच वर्षांपूर्वी घडलेल्या या घटनेला 'दुर्मिळातील दुर्मिळ घटना' असे संबोधून तीनसदस्यीय खंडपीठाने हा निकाल दिला. निर्भया प्रकरणात फाशीशिवाय दुसऱ्या शिक्षेचा विचारही होऊ शकत नाही, असे निकालपत्रात नमूद केले आहे. निकाल देत असताना न्यायालयातील उपस्थित सर्वांनी उभे राहून टाळ्या वाजवून निकालाचे स्वागत केले. निर्भयाचे वडील बद्रीनाथ सिंग यांनी निकालाबाबत प्रतिक्रिया देताना, 'आज रात्री मी शांतपणे झोपेन' असे सांगितले. याचाच अर्थ पाच वर्षांची ही अस्वस्थता काही प्रमाणात या निकालाने कमी होण्यास मदत होईल; पण मृत्यूशी शर्थीने झुंज देणाऱ्या निर्भयाला काही प्रमाणात न्याय मिळाला असला तरी त्यासाठी आपले सुंदर आयुष्य गमवावे लागले, हे विसरता येणार नाही. निर्भयाची आई आशादेवी यांनी, येत्या १० मे रोजी निर्भयाचा अठ्ठाविसावा वाढदिवस आहे, न्यायालयाचा निकाल म्हणजे तिला वाढदिवसाची भेट आहे,' असे म्हटले आहे.

महिला-युवती यांच्यावरील बलात्कारांचे वाढते प्रमाण हे नक्कीच सुन्न, अस्वस्थ करणारे आहे. तान्ह्या मुलीपासून ते प्रौढ महिलांपर्यंत अनेकजणी बलात्काराला बळी पडतात. सुदैवाने यातून वाचलेल्या युवतीचे पुढील भावविश्व कोलमडून पडण्याची अधिक भीती असते. या मानसिक धक्क्यातून त्यांना सावरून घेण्याची गरज असल्याने, या प्रकारची मानसोपचार केंद्रे उपयुक्त ठरतात. एखाद्या असहाय्य मुलीवर बळजबरीने असे कृत्य करणे जसे निंदणीय आहे, तसेच ते महिलेच्या समाजातील स्थानाला आव्हान देणारे आहे. निर्भया प्रकरणानंतर महिलांच्या सुरक्षिततेसाठीचे मोबाइल ॲप, हेल्पलाइन सुरू करण्यात आल्या आहेत. तरीही अनेक घटना घडत आहेत. कोपर्डीच्या अमानुष घटनेमुळे पुन्हा एकदा तीव्र संताप व्यक्त झाला. मुंबईतील महिला पत्रकारावरील सामूहिक बलात्काराने पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधले गेले. ज्या समाजात निर्भयपणे मुली-महिला उघडपणे वावरू शकतात तेथे खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता आहे, असे म्हणता येईल. सामाजिक सुरक्षेची जबाबदारी ज्या यंत्रणेवर आहे, तेथेही महिलांवर झालेल्या बलात्काराच्या घटनेने, सार्वजनिक सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. एकूणच निर्भया प्रकरणापासून बोध घेऊन गुन्हेगारांवर आवश्यक ती कार्यवाही वेळेत होणे गरजेचे आहे, असे वाटणे स्वाभाविक आहे.

**डॉ. निशा मुडे-पवार**
nishapawar1968@rediffmail.com

10 MAY 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृहामध्ये प्राध्यापकांच्या पुढाकाराने आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने फुलविण्यात आलेली बाग. (छाया : एस. अली)

# विद्यापीठाच्या वसतिगृहाचा कायापालट

## ओसाड जमिनीवर फुलविली बाग, मेसमध्ये बायोमेट्रिकचा वापर

**कोल्हापूर / वैभव गोंधळी :**

शिवाजी विद्यापीठात वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून बाग फुलविण्यात आली असून सुरक्षेसाठी सीसीटीव्ही आणि अभ्यासासाठी स्टडीरूम तसेच बायोमेट्रिकमुळे विद्यार्थी वसतिगृहाचा कायापालट झाला आहे.

शिवाजी विद्यापीठात विविध अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी राज्यभरातून विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रवेश घेतात. बाहेरून आलेल्या मुला-मुलींसाठी विद्यापीठाचे वसतिगृह हा किफायतशीर आणि सुरक्षित असा पर्याय आहे. त्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थिनी शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहात प्रवेश घेतात. विद्यार्थिनींसाठी एक तर विद्यार्थ्यांसाठी एक, दोन आणि तीन क्रमांकाची वसतिगृहे आहेत. ही सर्व वसतिगृहे नेहमीच हाऊसफुल्ल असतात.

विद्यापीठाच्या मुलांच्या वसतिगृहाचा परिसर आजवर ओसाड होता. मात्र काही प्राध्यापक आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी वसतिगृहाचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून वसतिगृहाच्या परिसरात फेब्रुवारी महिन्यात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लावतानाही ही पर्यावरण शास्त्राच्या प्राध्यापकांच्या सल्ल्याने ज्या वृक्षावर भविष्यात पक्षी अधिवास करू शकतील, अशाचा रोपांचा समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांनी श्रमदानातून २५० वृक्षांचे रोपण करण्यात आले. तसेच ऐन उन्हाळ्यातही त्यांना पाणी देण्याची जबाबदारी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी उचलली. फेब्रुवारी महिन्यापासून पारही पाडली. वृक्षारोपण केल्यापासून सर्व रोपट्यांची योग्य प्रकारे निगा वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी केली आहे.

वसतिगृहाच्या मेसमध्ये अनेक वेळा माजी विद्यार्थी तसेच वसतिगृहात नसलेले काही विद्यार्थी येतात. हे टाळण्यासाठी वसतिगृहात बायोमेट्रिक बसविण्यात आले आहे. यामध्ये थम केल्यानंतर मेसचे कूपन मिळते आणि कूपन असलेल्यांनाच जेवण मिळते. त्यामुळे वसतिगृहामध्ये सध्या प्रवेश असलेल्यांनाच जेवण मिळते. वसतिगृहात विद्यार्थी आपआपल्या रूममध्येच अभ्यास करत असत. मात्र आता वसतिगृहाच्या टेरेसवर अभ्यासिकेची निर्मिती करण्यात आली. सर्व विद्यार्थी अभ्यास करीत असल्याने आपोआपच अभ्यासासाठी पूरक असे वातावरण निर्माण झाले आहे.

मुलांच्या विद्यापीठाच्या वसतिगृहात सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता तो सुरक्षेचा. वसतिगृहात अनेक ठिकाणांहून आतमध्ये प्रवेश करता येत असे. हे सर्व मार्ग बंद करून तसेच एकाच ठिकाणावरून प्रवेशासाठी मार्ग देण्यात आला. त्याठिकाणी असलेल्या सुरक्षारक्षकांकडून विद्यार्थ्यांचे ओळखपत्र पाहून त्याची नोंद करूनच आत मध्ये सोडण्यात येते. तसेच परिसरात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्हीमुळे वसतिगृहाच्या सुरक्षेमध्ये भर पडली. विद्यार्थ्यांच्या सहकार्याने येत्या शैक्षणिक वर्षात आणखी काही नव्या संकल्पना राबवून वसतिगृहाचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



### विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून बदल शक्य

वसतिगृहाच्या तीन एकर ओसाड परिसरात वृक्षारोपण करणे हे मोठे वेळखाऊ तसेच खर्चिक काम होते. मात्र, प्राध्यापकांचा सक्रिय सहभाग आणि विद्यार्थ्यांच्या श्रमदानामुळे वसतिगृहाच्या परिसराचा कायापालट करणे शक्य झाले. विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानामुळे कमी खर्चात ही बाग निर्माण झालीच त्याचबरोबर स्वतः लावलेल्या झाडांची विद्यार्थ्यांनी स्वतः निगा ही राखली आहे.

**— जी. बी. कोळेकर**

चीफ रेक्टर विद्यार्थी वसतिगृह शिवाजी विद्यापीठ